दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.१५ मार्च २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १९७ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 15 March 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 197 | Pages 4 | Rate 4 Rs


## एकनाथ शिंदेंच्या ठाण्यातील प्रशासन सज्ज

**मुंबई**–आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या इराण-इस्राईल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर इंधन पुरवठ्याबाबत देशभरात चर्चा सुरू असताना राज्य शासनाने गॅस सिलेंडर पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. घरगुती तसेच व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरचा पुरवठा खंडित होऊ नये यासाठी प्रशासन सतर्क झाले आहे. ठाणे जिल्हा प्रशासनाने या पार्श्वभूमीवर २४ तास कार्यरत राहणारा नियंत्रण कक्ष सुरू केला असून नागरिकांसाठी ८१६९२३०६६५ हा हेल्पलाईन क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. संभाव्य टंचाई टाळण्यासाठी आणि गॅस पुरवठा साखळीवर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हा स्तरावर विशेष समितीही स्थापन करण्यात आली आहे.अन्न व नागरी पुरवठा विभागाने राज्यभर नियंत्रण कक्ष आणि जिल्हास्तरीय समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार ठाणे जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत करण्यात आली आहे. या समितीत पोलीस प्रशासन, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सरकारी तेल कंपन्यांचे प्रतिनिधी सहभागी असतील. गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत राहावा, वाहतूक आणि वितरणात अडथळे येऊ नयेत तसेच कायदा व सुव्यवस्था राखली जावी, यासाठी समिती दररोज परिस्थितीचा आढावा घेणार आहे.

# राज्यात एलपीजीचा कोणताही तुटवडा नाही
# गॅस,इंधन तुटवड्याच्या फक्त अफवा अन् संभ्रम
## राज्याच्या अन्न व नागरी पुरवठा मंत्र्यांचे स्पष्टीकरण

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

राज्यात घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नाही. या प्रकरणी केवळ संभ्रम व अफवा पसरल्या आहेत. त्यामुळे त्यावर कुणीही विश्वास ठेवू नये, असे आवाहन राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे. राज्यात घरगुती एलपीजीची दैनंदिन मागणी ९ हजार मेट्रिक टन असताना, उत्पादन वाढवून ११ हजार मेट्रिक टनांपर्यंत करण्यात आले आहे. त्यामुळे मार्च महिन्यात गेल्या ६ महिन्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात सिलेंडर उपलब्ध आहेत, असे ते म्हणालेत.

इराण विरुद्ध इस्त्रायल - अमेरिका युद्धामुळे राज्यात स्वयंपाकाच्या गॅसचा भयंकर तुटवडा निर्माण झाला आहे. बुकिंग करूनही गॅस मिळत नसल्यामुळे नागरिकांच्या गॅस एजन्सीपुढे लांबलचक रांगा लागल्या आहेत. सरकारने एका परिपत्रकाद्वारे गॅस वितरणाशी संबंधित नियमावली जाहीर केली आहे. त्यात प्राधान्यक्रम क्षेत्र व त्यांना गरजेनुसार किती गॅस पुरवठा करायचा? यासंबंधी स्पष्ट केले आहे. विशेषतः शैक्षणिक क्षेत्र व इतर काही क्षेत्रांना १०० टक्के, तर इतर घटकांना ७० ते ५० टक्के गॅस पुरवठा करण्याची सूचना करण्यात आली आहे. पण त्यानंतरही सर्वसामान्यांमधील गॅसच्या पुरवठ्याविषयी असलेली भीती संपली नाही. या पार्श्वभूमीवर मंत्री छगन भुजबळ यांनी उपरोक्त आवाहन केले आहे.




छगन भुजबळ शनिवारी एका पोस्टद्वारे म्हणाले की, आखाती देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील गॅस आणि इंधन पुरवठ्याबाबत अनेक संभ्रम आणि अफवा राज्यात पसरल्या आहेत. राज्यात घरगुती एलपीजीचा तुटवडा नसून, नागरिकांनी इंधन किंवा गॅस तुटवड्याबाबत कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन राज्य शासनाच्या वतीने मी जनतेला करत आहे.राज्यात घरगुती एलपीजीची दैनंदिन मागणी ९,००० मेट्रिक टन असताना, उत्पादन वाढवून ते ११,००० मेट्रिक टनांपर्यंत नेले आहे. मार्च महिन्यात गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात सिलेंडर उपलब्ध आहेत. पेट्रोल आणि डिझेलचाही पुरेसा साठा उपलब्ध असून रिफायनरी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. त्यामुळे घरगुती गॅस सिलेंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याबाबत नागरिकांनी निश्चिंत राहावे.गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष समित्या स्थापन केल्या आहेत. रुग्णालये, शाळा, आश्रमशाळा आणि अत्यावश्यक सेवांना गॅस पुरवठा प्राधान्याने मिळेल, याची चोख व्यवस्था करण्यात आली आहे. कोणत्याही तांत्रिक अडचणी किंवा तक्रारींसाठी तालुका व जिल्हा स्तरावर नियंत्रण कक्ष आणि व्हॉट्सअॅप सुविधा तातडीने कार्यान्वित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुरवठा विभाग परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवून आहे. राज्यातील गॅस आणि इंधन पुरवठा सुरळीत राहण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे त्यांनी म्हटले आहे.

# येडेश्वरीचे सर्वाधिक गाळप; कारखान्याचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या संपन्न
### ९.२२ लाख मेट्रिक टन ऊस गाळप; खा.बजरंग सोनवणे यांनी शेतकरी-कामगारांचे केले कौतूक

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

तालुक्यातील आनंदगाव येथील येडेश्वरी साखर कारखाना लि. (युनिट क्र.१) चा सन २०२५-२६ चा गळीत हंगाम मिल पूजन करून उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी व कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे यंदाचा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्णत्वास गेला. बीड जिल्ह्यात सर्वाधिक उसाचे गाळप येडेश्वरी कारखान्याने केले आहे.



कारखान्याकडून यंदाच्या हंगामात एकूण ९,२२,११६.३७९ मेट्रिक टन ऊस गाळप करण्यात आले असून, ही कामगिरी कारखान्यासाठी निश्चितच अभिमानास्पद मानली जात आहे. संपूर्ण हंगामात ऊस पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी शेतकरी आणि कारखाना प्रशासन यांच्यात चांगला समन्वय राखण्यात आला. तसेच कामगारांचे नियोजन, वाहतूक व्यवस्था आणि तांत्रिक व्यवस्थापन यामुळे गळीत प्रक्रिया निर्विघ्नपणे पार पडली. गळीत हंगामाच्या सांगता समारंभानिमित्त मिल पूजन करण्यात आले. यावेळी कारखान्याच्या प्रगतीसाठी सर्व घटकांनी परिश्रम घेतल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी खा.बजरंग सोनवणे म्हणाले, 'येडेश्वरी साखर कारखान्याचा २०२५-२६ चा गळीत हंगाम यशस्वीरीत्या पूर्ण होणे ही आनंदाची बाब आहे. ऊस उत्पादक शेतकरी, कारखान्याचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी व कामगार यांच्या संयुक्त परिश्रमांमुळे ही उल्लेखनीय कामगिरी शक्य झाली आहे. सर्व संबंधितांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. पुढील गळीत हंगाम अधिक यशस्वी व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो, असेही ते म्हणाले. दरम्यान, या यशस्वी हंगामानिमित्त ऊस उत्पादक शेतकरी, कामगार, अधिकारी व कर्मचारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, पुढील हंगामासाठीही उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# गॅस तुटवड्याच्या चर्चेमुळे एजन्सी समोर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा,टाकीचे वजन करूनच घ्या-लिंबराज गायकवाड वंचित बहुजन आघाडी

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

इराण-इस्रायल युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधन टंचाई ची चर्चा सुरू झाल्याने त्याच्या झळा आता महाराष्ट्रातील सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचल्याचे चित्र दिसत आहे.घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने केज शहरात गॅस बुकिंगसाठी नागरिकांच्या मोठ्या रांगा लागल्याचे दिसून येत आहे.घरगुती एलपीजी गॅस सिलिंडर वितरण प्रणालीत सरकारकडून पुन्हा एकदा महत्त्वपूर्ण बदल करण्यात आला आहे. नव्या नियमानुसार दोन सिलिंडर घेण्यामधील कालावधी वाढविण्यात आला असून ग्रामीण भागात ४५ दिवसांनंतर तर शहरी भागात ४० दिवसांनंतरच नवीन सिलिंडरचे बुकिंग करता येणार आहे.यापूर्वी हा कालावधी २५ दिवसांचा होता.या नव्या नियमा मुळे सर्वसामान्य नागरिकांना अडचणींचा सामना



करावा लागत असल्याचे दिसत आहे.
दरम्यान,मोबाईलवरून गॅस बुकिंग होत नसल्याच्या तक्रारीही नागरिकांकडून करण्यात येत आहेत.त्यामुळे अनेक नागरिक थेट गॅस एजन्सीवर येऊन बुकिंग साठी गर्दी करतानादिसत आहेत.सकाळपासूनच एजन्सीसमोर ग्राहकांच्या लांबच लांब रांगा लागलेल्या पाहायला मिळत आहेत.उन्हाचे चटके सहन करत अनेक नागरिक रिकाम्या गॅस टाक्या घेऊन रांगेत उभे असल्याचे चित्र सध्या केज शहरात दिसत आहे.
दरम्यान,नागरिकांची फसवणूक होऊ नये यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने गॅस टाकीचे प्रत्यक्ष वजन करून नागरिकांना दाखवण्यात आले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते लिंबराज गायकवाड,प्रवक्ते प्रदिप गायकवाड यांनी नागरिकांना आवाहन करताना सांगितले की, गॅस टाकी घेताना तिचे वजन तपासूनच ती स्वीकारावी,कारण काही वेळा कमी वजनाची टाकी दिली जाण्याची शक्यता असते.तसेच गॅस वितरणकेंद्रांवर ग्राहकांना योग्य सेवा मिळावी, टाकीचे अचूक वजन असावे आणि कोणत्याही प्रकारची फसवणूक होऊ नये यासाठी प्रशासनाने लक्ष द्यावे,अशी मागणी ही यावेळी करण्यात आली.एकूणच युद्धजन्य परिस्थिती,गॅस बुकिंग वरील नव्या अटी आणि सिलिंडर तुटवड्याच्या चर्चेमुळे सामान्य नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून केज शहरात गॅस एजन्सीसमोर नागरिकांच्या रांगा लागल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

# तांबवा येथे जुन्या वादातून तरुणावर कत्तीने हल्ला,पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंद

दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील तांबवा येथे जुन्या वादाची कुरापत काढून एका तरुणावर कत्तीने आणि लोखंडी रॉडने जीवघेणा हल्लाकेल्याची धक्कादायक घटना घडली असून याप्रकरणी केज पोलीसात पाच जणांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
नरसिंग उर्फ संग्राम अभिमान चाटे,रा.तांबवा यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे.गुरूवार दि. १२ मार्च रोजी दुपारी दीडच्या सुमारास संग्राम चाटे आणि त्यांचा मित्र अदित्य बडे हे तांबवा येथील जिल्हा परिषद शाळेजवळून मुख्य रस्त्याने जात असताना आरोपींनी त्यांची दुचाकी आडवून,दया विलासचाटे याने जुन्या भांडणाची कुरापत काढून जिवे मारण्याच्या उद्देशाने संग्रामच्या डोक्यावर धारदार कत्तीने वार केला
शरद परमेश्वर चाटे याने संग्रामच्या डोळ्यात मिरची पूड टाकली,तर अमोल अनिल ठोंबरे, सागर रामधन चाटेआणि गोट्या भालेकर यांनी लोखंडी रॉडने संग्रामच्या पाठीवर,खांद्यावर आणि मानेवर बेदम मारहाण केली.या हल्ल्यानंतर संग्राम बेशुद्ध पडला होता.त्याला तातडीने केज येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारा साठी दाखल करण्यात



आले.याप्रकरणी नरसिंग उर्फ संग्राम अभिमान चाटे यांचे फिर्यादीवरून
दया विलास चाटे,शरद परमेश्वर चाटे,अमोल अनिल ठोंबरे,सागर रामधन चाटे व गोट्या भालेकर या पाच जणां विरुद्ध केज पोलिसात गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुकुमार बनसोडे हे पुढील तपास करीत आहेत.

# वीस विजेच्या पोलवरील सव्वा पाच लाखाच्या विद्युत तारेची चोरी
## केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल




दैनिक वादळ वार्ता
**केज | प्रतिनिधी**

केज तालुक्यातील गप्पेवाडी ते घाटेवाडी रस्त्यावरील नामेवाडी शिवांरातील बाळूमामा मंदिरापासून घाटेवाडी पर्यंतच्या वीस विद्युत पोलवरील अल्युमिनियम ची ५ लाख २५ हजार रुपये किंमतीची तार अज्ञात चोरट्याने चोरून नेल्या प्रकरणी महावितरणचे गुत्तेदार संतोष चंदर मुरकुटे यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध केज पोलिसात गुरूवारी गून्हा नोंद झाला आहे.बुधवार दि.४ मार्च रोजी सकाळी साडे आठ वाजण्याच्या दरम्यान अज्ञात आरोपीनी नामेवाडी,गप्पेवाडी आणि घाटेवाडी शिवारातील दोन ते अडीच किलो मीटर अंतरातील रस्त्याच्या लगत उभारण्यात आलेल्या वीस लोखंडी विद्युत पोलवरील अल्युमिनियम लिमिटेड कंपनीची ५ लाख २५ हजार रुपये किंमतीची तार कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेल्या प्रकरणी महावितरणचे गुत्तेदार संतोष चंदर मुरकुटे यांच्या फिर्यादी वरून अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलिसात गून्हा नोंद झाला असून पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक उमेश निकम हे पुढील तपास करीत आहेत.

# मंत्रालयात ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांसाठी शासकीय मदतीची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**माजायगाव | प्रतिनिधी**

मंत्रालय, मुंबई येथे गावातील मयत ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांना शासकीय आर्थिक मदत मिळावी या मागणीसाठी अनिल राधे कांबळे (ऊसतोड कामगार संघटनेचे अध्यक्ष तथा ब्रम्हगावचे उपसरपंच) यांनी शासनस्तरावर पाठपुरावा केला.
यावेळी त्यांनी आदरणीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस , उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या कार्यालयातील सचिवांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.
गावातील ऊसतोड मजूर रामकिसन मसाजी कांबळे, बाळू रामकिसन कांबळे व बाळासाहेब दासू कांबळे यांचे निधन झाले असून त्यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून तातडीने आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.
मंत्रालयात झालेल्या चर्चेदरम्यान संबंधित प्रकरणाचा तातडीने विचार करून मयतांच्या कुटुंबीयांना शक्य तितक्या लवकर शासकीय मदत देण्याबाबत सकारात्मक प्रतिसाद देण्यात आल्याची माहिती अनिल राधे कांबळे यांनी दिली.
ऊसतोड मजुरांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा व



त्यांना आर्थिक आधार मिळावा यासाठी आपण सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा करत राहणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

# संपादकीय

## अमेरिका-इराण संघर्षामुळे कच्च्या तेलाचा भडका; तुमच्या खिशाला झळ बसणार का?

जगातील राजकारणात एखाद्या ठिणगीचा ज्वालामुखी व्हायला फार वेळ लागत नाही. मध्यपूर्वेतील राजकारण हे तर कायमच बारूदाच्या ढिगाऱ्यावर उभे असते. अशाच परिस्थितीत पुन्हा एकदा अमेरिका आणि इराण यांच्यातील तणाव तीव्र झाला आहे आणि त्याचा सर्वात मोठा परिणाम जगभरातील अर्थव्यवस्थेवर, विशेषतः कच्च्या तेलाच्या किंमतींवर होताना दिसत आहे. कच्च्या तेलाच्या दराने घेतलेली उसळी ही केवळ आंतरराष्ट्रीय बाजारातील आकड्यांची गोष्ट नाही; ती थेट सर्वसामान्यांच्या खिशाशी, त्यांच्या रोजच्या आयुष्याशी आणि देशाच्या अर्थकारणाशी जोडलेली आहे. आज पेट्रोल पंपावर उभ्या असलेल्या सामान्य नागरिकाच्या मनात एकच प्रश्न घोंगावत आहे की, जगाच्या राजकारणात होणाऱ्या संघर्षाची किंमत आम्हालाच का मोजावी लागते?

जगातील बहुतेक कच्चे तेल मध्यपूर्वेतून येते. इराण, सौदी अरेबिया, इराक, कुवेत, संयुक्त अरब अमिराती हे देश तेलसंपन्न आहेत. त्यामुळे या प्रदेशातील राजकीय तणावाचा थेट परिणाम जागतिक तेल बाजारावर होतो. अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष हा नवीन नाही. गेल्या अनेक दशकांपासून या दोन देशांमध्ये वैचारिक, राजकीय आणि लष्करी संघर्ष सुरू आहे. अणुकरार, निर्बंध, आर्थिक दबाव आणि लष्करी कारवाया या सगळ्या गोष्टींमुळे या प्रदेशातील वातावरण सतत तणावपूर्ण राहिले आहे. जेव्हा या संघर्षाची तीव्रता वाढते, तेव्हा तेलाच्या पुरवठ्यावर परिणाम होण्याची भीती निर्माण होते. बाजारात भीती निर्माण झाली की व्यापारी मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करतात आणि त्याचा परिणाम म्हणून कच्च्या तेलाच्या किंमती अचानक वाढतात. ही वाढ केवळ व्यापाऱ्यांच्या आकड्यांमध्ये दिसत नाही; ती प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेत धक्के निर्माण करते. भारत हा जगातील सर्वात मोठ्या तेल आयात करणाऱ्या देशांपैकी एक आहे. आपल्या देशातील जवळपास ८५ टक्के कच्चे तेल परदेशातून आयात केले जाते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात किंमत वाढली की त्याचा थेट परिणाम भारतावर होतो.

कच्च्या तेलाचे दर वाढले की पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस, विमान इंधन यांचे दर वाढतात आणि त्यानंतर सुरू होते महागाईची साखळी प्रतिक्रिया. डिझेल महाग झाले की वाहतूक खर्च वाढतो. वाहतूक खर्च वाढला की भाजीपाला, धान्य, फळे, दूध, बांधकाम साहित्य अशा सर्व वस्तूंच्या किंमती वाढतात. शेवटी याचा सर्वात मोठा फटका बसतो तो सामान्य मध्यमवर्गीय आणि गरीब नागरिकांना. महागाई ही एक अशी आग आहे जी दिसत नाही, पण ती हळूहळू सर्वसामान्यांचे आयुष्य जाळत जाते. आज आधीच महागाईचा ताण वाढलेला आहे. घरभाडे वाढले आहे, शिक्षण महाग झाले आहे, आरोग्यसेवा खर्चिक झाली आहे. त्यात जर इंधनाच्या दरात वाढ झाली तर ती सामान्य माणसाच्या बजेटला अक्षरशः हादरवून टाकते. एका सामान्य कुटुंबाचा विचार करा. घरात नोकरी करणारा एक व्यक्ती आहे. महिन्याचे ठरलेले उत्पन्न आहे. घरभाडे, मुलांचे शिक्षण, वीजबिल, किराणा, औषधे सगळे खर्च ठरलेले आहेत.

जर पेट्रोल १०-१५ रुपये वाढले तर त्याचा परिणाम केवळ वाहन चालवण्यापुरता मर्यादित राहत नाही. तो संपूर्ण घरखर्चावर परिणाम करतो. मग सुरू होते तडजोडीचे आयुष्य. कधी मुलांच्या शिक्षणात काटकसर, कधी आरोग्यावर तडजोड, कधी स्वतःच्या छोट्या आनंदांवर पाणी. जगातील महासत्तांच्या राजकारणाची किंमत अशा प्रकारे सामान्य नागरिक भरत असतो. तेल म्हणजे केवळ वाहन चालवण्यासाठीचे इंधन नाही. आजच्या आधुनिक अर्थव्यवस्थेचा तो कणा आहे. औद्योगिक उत्पादन, वाहतूक व्यवस्था, शेती, विमान सेवा, रासायनिक उद्योग या सगळ्यांचे जीवन तेलावर अवलंबून आहे. तेल महाग झाले की उत्पादन खर्च वाढतो. उत्पादन खर्च वाढला की वस्तू महाग होतात. म्हणजेच कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेवर पडणारा आर्थिक भूकंप.

जगातील राजकारण अनेकदा शक्तीच्या खेळावर आधारित असते. महासत्ता आपले वर्चस्व टिकवण्यासाठी आर्थिक निर्बंध, लष्करी दबाव आणि राजनैतिक खेळी करत असतात. परंतु या सगळ्या खेळात सर्वात मोठे बळी ठरतात ते सामान्य नागरिक. इराणवर निर्बंध घालणे, तेलाच्या निर्यातीवर मर्यादा आणणे किंवा लष्करी तणाव वाढवणे, या सगळ्यांचा परिणाम थेट तेलाच्या पुरवठ्यावर होतो आणि त्यानंतर सुरू होते जागतिक बाजारातील किंमतींची स्पर्धा. तेलाचे दर वाढतात आणि त्याची झळ जगातील प्रत्येक देशाला बसते. या परिस्थितीत भारतासमोर मोठा प्रश्न उभा राहतो, आपण या संकटातून कसे बाहेर पडणार? कच्च्या तेलावर अवलंबित्व कमी करणे हा दीर्घकालीन उपाय आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा, इलेक्ट्रिक वाहने, जैवइंधन यांसारख्या पर्यायी ऊर्जा स्रोतांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. सरकारने गेल्या काही वर्षांत इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अजूनही देशात पेट्रोल आणि डिझेलवर चालणाऱ्या वाहनांची संख्या प्रचंड आहे. ऊर्जा स्वावलंबनाचा मार्ग सोपा नाही, पण तो आवश्यक आहे. अशा वेळी सरकारची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते. इंधनावरील कर कमी करणे, पर्यायी ऊर्जा प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे या सर्व गोष्टींचा गंभीरपणे विचार करणे गरजेचे आहे. कारण महागाईचा सर्वात मोठा फटका बसतो तो सामान्य नागरिकांना. सरकारचे अर्थकारण आणि नागरिकांचे जगणे यामध्ये समतोल साधणे ही मोठी जबाबदारी आहे. आज जगाला सर्वात जास्त गरज आहे ती शांततेची. युद्ध, संघर्ष आणि निर्बंध यामुळे कोणाचाही खरा फायदा होत नाही. त्यातून फक्त वाढते ते अस्थिरता, महागाई आणि आर्थिक संकट. जगातील महासत्तांनी आपल्या राजकीय आणि लष्करी स्वार्थापलीकडे जाऊन मानवतेचा विचार करण्याची वेळ आली आहे. कारण एका देशातील संघर्षाची झळ आज संपूर्ण जगाला बसते. आज पेट्रोल पंपावर उभा असलेला सामान्य भारतीय नागरिक कदाचित जागतिक राजकारण समजत नसावा. त्याला माहित नसते अणुकरार काय असतो, निर्बंध काय असतात, किंवा मध्यपूर्वेतील भू-राजकारण काय असते. पण त्याला एक गोष्ट नक्की समजते की, पेट्रोल महाग झाले की त्याचे आयुष्य कठीण होते. अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर कच्च्या तेलाच्या किंमती पुन्हा वाढण्याची शक्यता व्यक्त होत आहे. जर ही परिस्थिती नियंत्रणात आली नाही, तर त्याचा थेट परिणाम भारतासह अनेक देशांच्या अर्थव्यवस्थेवर होणार आहे. जगातील राजकारणातील संघर्षांची किंमत शेवटी सामान्य नागरिकालाच मोजावी लागते, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आजचा खरा प्रश्न असा आहे की, जगातील महासत्ता आपले राजकारण थांबवतील का, की सामान्य नागरिकांच्या खिशाला पुन्हा एकदा झळ बसणार आहे? कारण कच्च्या तेलाच्या भडक्याची आग शेवटी पेट्रोल पंपावर नव्हे, तर सामान्य माणसाच्या जीवनात पेटते.

**प्रवीण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

# चोरलेल्या तीन लाखांच्या तिन मोटारसायकली जालना जिल्ह्यातून जप्त

## माजलगाव शहर पोलिसांची चमकदार कामगिरी; नागरिकांकडून समाधान व्यक्त

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहर पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने चोरलेल्या तीन मोटारसायकली ज्याची किंमत ३ लाख रुपये आहे. त्या गाड्या जालना जिल्ह्यातून जप्त करून उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या कारवाईमुळे नागरिकांमधून पोलिसां विषयी समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

सध्या माजलगाव तालुक्यासह राज्यभरात मोटारसायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ होत असून अशा वाहनांचा शोध घेणे पोलिसांसाठी मोठे आव्हान ठरत आहे. मात्र माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी पथकाने तत्परता दाखवत ही कारवाई यशस्वी केली.



गुप्त माहितीच्या आधारे डीबी पथकाने जालना जिल्ह्यातील परतूर तालुक्यातील वाटूर फाटा परिसरात छापा टाकून तीन चोरीच्या मोटारसायकली मोठ्या शिताफीने जप्त केल्या.

या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संदीप राठोड तसेच पोलीस कर्मचारी महेश चव्हाण, सुनिल गवळी, आसलम शेख, गायकवाड आणि जायभाये यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

पोलिसांनी जप्त केलेल्या मोटारसायकलींमध्ये आरवनफाईव्ह व हिरो कंपनीच्या मोटारसायकलींचा समावेश असून त्यांची एकूण किंमत ३ लाख रुपयांच्या घरात असल्याचे सांगितले जात आहे. दरम्यान, पुढील काळातही मोटारसायकल चोरीच्या इतर प्रकरणांचा तपास करून आणखी वाहनांचा शोध लावण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

या कारवाईमुळे माजलगाव शहरातील नागरिकांकडून पोलिसांच्या सतर्कतेचे आणि कार्यतत्परतेचे कौतुक करण्यात येत आहे.

# गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स येथे वार्षिक उमंग फेस्टचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील नामांकित शैक्षणिक संकुल गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स येथे काल दिमाखात 'उमंग' या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. या उत्सवात डी फार्मसी, बी फार्मसी, बीएएमएस, फिजिओथेरपी, नर्सिंगच्या विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. तीन दिवस चालणाऱ्या या उमंग फेस्ट मध्ये ट्रॅडिशनल डे, बॉलिवूड डे सेलिब्रेशन, डान्स, ड्रामा अशा विविध क्टिव्हिटी होणार आहेत तसेच या कार्यक्रमाची सांगता सिने अभिनेते संदीप पाठक यांच्या उपस्थितीत आणि एकपात्री नाटक 'व्हराड निघाले लंडनला' याच्या सादरीकरणाने होणार आहे.

उमंग फेस्टचे उद्घाटन मान्यवरांनी प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलाने करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नामांकित पत्रकार रत्नाकर कुलथे यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. प्रकाश राजेभोसले यांनी भूषविले



त्यांच्या सोबत मंचावर सौ. नंदिनी राजेभोसले, गुरुकृपा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या सचिव डॉ. प्रियंका राजेभोसले, आयुर्वेद महाविद्यालयाचे डायरेक्टर डॉ. प्रज्वल म्हस्के, फिजिओथेरपीचे प्राचार्य डॉ. मकेश बाबू, फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अमित बिंदू आदी मंडळी उपस्थित होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. अमित बिंदू यांनी केले तसेच डॉ. मकेश बाबू यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. प्रकाश राजेभोसले यांनी विद्यार्थ्यांना मागदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. इशिका यांनी केले त्यानंतर विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी घेतली.

# साडेचार वर्षाच्या जारा हिचा पहिला रोजा; सर्वत्र कौतुक

दैनिक वादळ वार्ता

पवित्र रमजान महिन्यात उपवास, नमाज आणि इबादतींना विशेष महत्त्व असते. या पवित्र महिन्यात अनेक जण श्रद्धेने रोजे पाळतात. त्यातच अवघ्या साडेचार वर्षांच्या जारा हिने आपला पहिला रोजा ठेवत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.जारा ही वनविभागात वनपाल म्हणून कार्यरत असलेल्या एस. एन. पठाण यांची कन्या आहे. एवढ्या लहान वयात जाराने रोजा ठेवत कुटुंबीयांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण केले. तिच्या या छोट्याशा पण प्रेरणादायी कृतीचे नातेवाईक, मित्रपरिवार आणि परिसरातूनही कौतुक होत आहे. रमजान महिन्यात उपवासाद्वारे संयम, शिस्त आणि श्रद्धा यांचे महत्त्व अधोरेखित केले जाते. जाराने लहान वयातच या पवित्र परंपरेची ओळख करून देत आपल्या कुटुंबाचा अभिमान वाढवला आहे. तिच्या पहिल्या रोज्याचा हा आनंदाचा क्षण कुटुंबीयांसाठी विशेष ठरला.



# ११ एप्रिलला तुलसी महाविद्यालयात १८ तास अध्ययन अभियान व नव्या विभागांचे उद्घाटन

## अभ्यासातून महापुरुषांना अभिवादन करण्यासाठी मोठ्या संख्येने सहभागी व्हा-आयोजकांचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त '१८ तास अध्ययन' या उपक्रमाचे आयोजन शनिवार, दि.११ रोजी तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात करण्यात आले आहे. या उपक्रमाचे हे दुसरे वर्ष असून, यानिमित्ताने महाविद्यालयाच्या इन्क्युबेशन सेंटरअंतर्गत तुलसी टेक सोल्युशन्स आणि पॉडकास्ट या नव्या उपक्रमांचेही मान्यवरांच्या हस्ते उदघाटन करण्यात येणार आहे. याचबरोबर १८ तास अध्ययन हा उपक्रम ११ एप्रिल रोजी सकाळी ६:०० वाजता सुरू होणार असून, यात सहभागी होणाऱ्या अभ्यासकांना सलग १८ तास अभ्यास करणे बंधनकारक आहे. सहभागी सर्वांना





नोंदणीनंतर विशेष प्रवेश पास देण्यात येणार आहेत.

उपक्रमादरम्यान अभ्यासकांच्या सोयीसाठी चहा, नाश्ता व भोजनाची मोफत व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अभ्यासासाठी विज्ञान, तंत्रज्ञान, स्पर्धा परीक्षा, प्रेरणादायी साहित्य तसेच महापुरुषांच्या जीवनकार्यावरील विविध साहित्य उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

याच दिवशी स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शन करण्यासाठी नामवंत मार्गदर्शकांचे विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले आहे. तसेच दहावी व बारावीनंतर उपलब्ध असलेल्या विविध करिअर संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे. वाचनाची आवड असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे. या अध्ययन उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या अभ्यासक, विद्यार्थ्यांनी ८८८८५७६६४०, ९५६१८१७४७४, ७०२०३०६६८७ आणि ९४२२९७४४३९ या क्रमांकांवर संपर्क साधून आपली नावनोंदणी निश्चित करावी, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे व आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महीलादिना निमित्त महापौरांच्या हस्ते उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या महिलांचा हिरकणी पुरस्कार देऊन सन्मान

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

ज्येष्ठ नागरिक संघ, नेरूळ आयोजित जागतिक महिला दिनाचा कार्यक्रम खूप छान झाला. प्रार्थना आणि दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाचा शुभारंभ झाला. कै. शं पा किंजवडेकर संस्थापक अध्यक्ष, यांच्या ९४ व्या जयंतीनिमित्त प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले तसेच मान्यवरांनी पुष्पांजली अर्पित केली. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावलेल्या महिलांना महापौरांच्या हस्ते हिरकणी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. याप्रसंगी बोलताना महापौर महोदया म्हणाल्या की नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे महिलांसाठी वाहन चालकांचे ट्रेनिंग उपक्रम राबविले जाणार आहेत. यामध्ये महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. महिलांचे सक्षमीकरण होणे गरजेचे आहे असे त्यांनी प्रतिपादन केले. हिरकणी पुरस्कार प्राप्त महीला श्रीमती इंगळे.श्रीमती रूचिता कर्पे श्रीमती कल्पना गायकवाड, श्रीमती भारती बिरामणे,श्रीमती सुरेखा शिवशरण,श्रीमती पाकीजा अत्तार,श्रीमती स्नेहल नाईक, श्रीमती भावना काळे, आणि श्रीमती करपे मॅडम यांनी प्रतिनिधीक





छान भाषण केले. तसेच छोटी हिरकणी कुमारी उनका सावंत हिने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून विविध क्षेत्रात नैपुण्य मिळवल्याबद्दल तिचाही महापौरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कुमारी उल्काने महिला दिनावर तसेच कै. डॉक्टर किंजवडेकर जयंती संदर्भात उत्कृष्ट भाषण केले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने विशेष निमंत्रित प्राध्यापिका वृषाली मगदूम स्त्रियांच्या वर होणारे अत्याचार आणि कायदे या संदर्भात विस्तृत माहिती दिली. प्रमुख वक्त्या श्रीमती वंदना शिंदे यांनी अंधश्रद्धेचे महिलांच्या मध्ये प्रमाण जास्त आहे. सगळी व्रतवैकल्य महिलांसाठीच आहेत. महिलांनी याच्यातून बाहेरपडलं पाहिजे आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, चौकसपणा बाळगला पाहिजे असे त्यांनी मार्मिकपणे सांगितले. याप्रसंगी त्यांनी बुवाबाजीचे प्रात्यक्षिक ही उपस्थितांना करून दाखविले आणि श्रोत्यांची व्हावा मिळवली. या कार्यक्रम प्रसंगी अनेक मान्यवर तसेच नगरसेविका उपस्थित होत्या. माननीय नगरसेविका श्रीमती नेत्रा शिर्के, श्रीमती माधुरी सुतार, श्रीमती स्वप्ना गावडे यांनी जागतिक महिला दिनानिमित्त श्रोत्यांना संबोधित केले. विकास साठे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते त्यांनी आपल्याअध्यक्ष भाषणात महिलादिनानिमित्त शुभेच्छा दिल्या. आज महिलांनी सर्व क्षेत्रात चौफेर प्रगती केलेली आहे.मात्र महिलांना हे स्थान मिळवून देण्यात सावित्रीबाई फुले आणि डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे फार मोठे योगदान आहे याचे स्मरण ठेवावे असे सांगितले. त्याचप्रमाणे ग्रामीण भागात आजही अनेक शोषित स्त्रिया आहेत, त्यांची दुःखे व्यथा व्यक्त होत नाहीत, त्यांच्यापर्यंत या सुधारणा पोहोचलेल्या नाहीत तरी सक्षम स्त्रियांनी भगिनीभाव धरून त्यांना देखील मदतीचा हात द्यावा असे सांगितले. श्री अजय माढेकर यांनी कार्यक्रमाचे सुंदर सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ नागरिक संघाच्या संपूर्ण कार्यकारिणीने सांघिक वृत्तीने व मेहनतीने हा कार्यक्रम यशस्वी केला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा सर्वांनी मनमुराद आस्वाद घेतला.

## पालकमंत्र्यांचा दूजाभाव;एसटी प्रकरणी परभणी जिल्ह्यावर कमालीचा अन्याय

# केवळ जिंतूरच नव्हे तर पालम, पूर्णा, गंगाखेड व अन्य तालुक्यांची दूर्लक्षित सेवा कधी सुधारणार ?

दैनिक वादळ वार्ता
**परभणी । प्रतिनिधी**





परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी जिंतूरच्या गोल्डन रुटवरची एसटी नियमित सुरु करुन प्रवाशांना न्याय द्यावा आणि या मार्गावर सलग बसचे नियोजन करावे, असे आदेश नुकताच त्यांनी विभागीय नियंत्रकांना दिले आहेत. त्यामुळे त्यांचे अभिनंदन आणि कीव सुध्दा करावी असे वाटते.

अभिनंदन एवढ्यासाठी की, राज्याच्या राज्यमंत्री आणि जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाची सुत्रं हाती घेऊन साधारण वर्षभराचा कालावधी उलटून गेला आहे. जिंतूर हे त्यांचे स्वतःचे मतदार क्षेत्र आहे. होम ग्राऊंडवरची एसटी समस्या सोडवण्यासाठी नव्हे तर दाद मागण्यासाठी एवढा कालावधी जाऊ शकतो तर मग उर्वरित जिल्ह्याला त्या न्याय कधी देणार हा खरा सवाल आहे. कालांतराने का होईना परंतु कागदी आदेशाचे घोडे किमान पाठवले म्हणून त्यांचे अभिनंदन आम्ही सर्वप्रथम मानले आहेत. दरम्यान, कीव एवढ्यासाठी की, त्यानी केलेला हा प्रयत्न सुध्दा केविलवाणा नव्हे तर निव्वळ संकुचितपणा असेच म्हणता यैईल. त्यांनी जिंतूरसाठी केलेली ही मागणी उर्वरित जिल्ह्यासाठी सुध्दा करता आली असती. परंतु तसे न केल्याने कदाचित त्यांना जिल्ह्याच्या पालकत्वाचे विस्मरण झाले असावे.

गाव तेथे रस्ता आणि रस्ता तेथे परिवहन सेवा हे महाराष्ट्र सरकारचे धोरण आहे. स्वतः मंत्री असल्याने त्यांना याचीही पूर्णपणे जाणीव असू शकते. तथापि परभणी जिल्ह्याच्या पालकत्वाची धुरा सांभाळताना त्यांना संपूर्ण राज्याकडेही लक्ष देणे अपेक्षित आहे. किंबहुना त्यासाठीच जिल्ह्यातील लाखो नागरिकांच्या अपेक्षा असते स्वाभाविक आहे. राज्याला स्वातंत्र्य मिळून ६७ वर्षे झाली आहेत. परंतु पालकमंत्र्यांच्या कार्यक्षेत्रातील पालम तालुका विकासापासून आजही उपेक्षित आहे. तेथे आजतागायत बसस्थानकच नाहीये. तालुका आणि प्रसिद्ध बाजारपेठ असलेल्या या शहरात एसटी स्थानक नसल्याने प्रवासी नागरिकांना आजही चक्क रस्त्यावरच तासन् तास ताटकळत उभे राहावे लागते. मग महिला-पुरुष प्रवासी असोत किंवा विद्यार्थी, वयोवृध्द, ज्येष्ठ असोत किंवा दिव्यांग, त्या सर्वांना नाईलाज म्हणून आपला जीव मुठीत धरूनच राज्य महामार्ग पार करणे भाग पडते. मागील अनेक वर्षांपासून वारंवार मागणी करूनही पालम सारख्या तालुका स्तरीय शहराला आजतागायत हक्काचे बस स्थानक मिळाले नाही. ही स्वतंत्र भारतातील महाराष्ट्राची व पालमच्या नागरिकांसाठी शोकांतिकाच म्हणता येईल. जेथे बस स्थानकच नाही तेथील गावखेड्यांमधल्या नागरिकांसाठी बस सेवा मिळणे म्हणजे दूरापास्तच ठरावे. तशीच भयाण अवस्था पूर्णा शंहरातही आहे. पूर्णा शहर सुध्दा तालुक्याचं आणि रेल्वेचं जंक्शन स्थळ आहे. परंतु तेथे असलेलं अगदी छोटंसं बस स्थानक ओसाड, जुनाट आणि एखाद्या खंडहरअवस्थेत असल्याने प्रवासी नागरिकांना त्रास सोसावा लागतो. पावसाळ्यात तर दैन्यावस्था असते.

या ठिकाणी राज्य परिवहन विभागाचा फार मोठा भूभाग असूनही तो बकालावस्थेत पडून आहे. या ठिकाणी प्रशस्थ असे बस स्थानक निर्माण करुन तेथे अद्ययावत अशा सर्व सोयीसुविधा पुरविल्या गेल्यास प्रवाशांची गैरसोय दूर होईल. उर्वरित मोकळ्या भूभागावर वाणिज्य गाड्यांची निर्मिती करुन त्या बदल्यात महामंडळाला दरमहा भरमसाठ भाडे मिळू शकेल. येणाऱ्या त्याच उत्पन्नातून देखभाल व डागडूजी करणे शक्य होईल. पूर्णा हे जंक्शन असल्याने येथे अनेक रेल्वेगाड्यांची वर्दळ असते. त्याशिवाय पूर्णा शहर ही मोठी बाजारपेठ आहे. येथे शनिवार आणि सौमवार असा आठवयातून दोन वेळा बाजार भरला जातो. त्यामुळे नांदेड, परभणी व हिंगोली जिल्ह्यातील नागरिक मोठ्या संख्येने येत असतात. पूर्णा हे शहर तीन जिल्ह्यांच्या मधोमध असून येथे व्यापारी, शेतकरी आणि उद्योजक आपल्या मालाची खरेदी-विक्री करतात. त्यामुळे सभोवतालच्या बहुतांश गावांतून परिवह्नन सेवा नियमित व सुव्यवस्थेत सुरु राहिली गेल्यास महामंडळाला बऱ्यापैकी फायदा होऊ शकेल शिवाय नागरिकांनाही सुविधा मिळली जाईल.

गंगाखेड बस स्थानकचीही तशीच भयाण अवस्था आहे. मोडकळीस आलेले व जीर्णावस्थैतीव या बस स्थानकावर प्रत्येकाला आपला जीव मुठीत धरून बसावे लागते. तालुका स्तर असलेल्या गंगाखेड शहरात सुसज्ज अशा बस स्थानकाची नितांत आवश्यकता आहे. त्यात अद्ययावत अशा सुविधांची उपलब्धता मिळाल्यास नाराज असलेला प्रवासी कदापी पाठ फिरवणार नाही.

पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी केवळ जिंतूर शहराकडैच नाही तर संपूर्ण परभणी जिल्ह्याकडे लक्ष देणे अगत्याचे ठरणार आहे. तर आणि तरच खऱ्या अर्थाने त्यांचे पालकत्व सिद्ध होईल अन्यथा नाराज नागरिक अधिकच दूर फेकले जातील. पर्यायाने प्रवासी नागरिकांमध्ये दूराग्रह निर्माण होऊ शकेल

---

### गॅस दरवाढ व एलपीजी सिलेंडरच्या तुटवड्याविरोधात लातूर तालुका काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

## दरवाढ तात्काळ मागे घ्यावी व नागरिकांना गॅस सिलेंडर नियमित उपलब्ध करून द्यावा, काँग्रेसची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**लातूर । प्रतिनिधी**



केंद्र सरकारने केलेल्या गॅस दरवाढीच्या निषेधार्थ तसेच बाजारपेठेत निर्माण झालेल्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या कृत्रिम तुटवड्याविरोधात माजी आमदार तथा लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख साहेब यांच्या सुचनेनुसार लातूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदारांना निवेदन देण्यात आले.

लातूर तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष उमेश बेद्रे यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, केंद्र सरकारकडून वारंवार करण्यात येत असलेल्या एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीमुळे सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान अधिकच कठीण झाले आहे. आधीच वाढत्या महागाईमुळे त्रस्त असलेल्या जनतेवर गॅस दरवाढीचा अतिरिक्त आर्थिक भार पडत आहे.

तसेच सध्या बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे दिसून येत असून अनेक ठिकाणी नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध होत नाही. त्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून सर्वसामान्य जनतेमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झालेला गॅस सिलेंडरचा तुटवडा दूर करावा व नागरिकांना गॅस सिलेंडर सहज व नियमित उपलब्ध होईल यासाठी योग्य ती उपाययोजना करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

यावेळी महेश चव्हाण प्रताप पाटील, बादल शेख, रामानंद जाधव प्रताप खोसे जनक गायकवाड, नरेंद्र गायकवाड, अभिजित भिसे ज्ञानेश्वर लकडे धिरज भांबरे, विनोद विर, फरमान शेख, संजय चव्हाण, नाना कसबे, निलेश गायकवाड, बाळासाहेब देशमुख, सोरभ देशमुख, मेघराज पाटील, नितीन जाधव, नामदेव उफाडे, बाळासाहेब कदम, विरसेन भोसले राणीताई खोडसे रोहीनी शिंदे संतोष स्वामीयांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## निलंग्यात गॅस दरवाढ विरोधात कॉंग्रेसचे आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**निलंगा । प्रतिनिधी**



केंद्र सरकारकडून वारंवार घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या किमतीत वाढ करण्यात येत असून यामुळे सर्वसामान्य नागरिकांना जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे. आधीच महागाईच्या वाढत्या ओझ्याखाली सामान्य नागरिक, महिला व कुटुंबचे-कुटुंब त्रस्त असताना गैस दरवाढ ही त्यांच्यावर आणखी एक आर्थिक भार ठरत आहे. गॅस दरवाढ तात्काळ मागे घ्यावी या मागणीसाठी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या सूचनेनुसार निलंगा तहसील कार्यालयासमोर कॉग्रेसच्या वतीने आंदोलन करुन निवेदन देण्यात आले.

निवेदनात सध्या बाजारपेठेत एलपीजी गॅस सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नागरिकांना वेळेवर गॅस सिलेंडर उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या परिस्थितीमुळे सर्वसामान्य जनतेत तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

त्यामुळे केंद्र सरकारकडे तात्काळ घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरच्या दरवाढीचा निर्णय तात्काळ मागे घ्यावा, बाजारपेठेत निर्माण झालेला सिलेंडरचा कृत्रिम तुटवडा तातडीने दूर करावा, सर्वसामान्य नागरिकांना सिलेंडर सहज व नियमित उपलब्ध होईल यासाठी योग्य ती उपाययोजना करावी अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

यावेळी तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, शहराध्यक्ष तथा नगरसेवक अजित नाईकवाडे, नगरसेवक डॉ गजेंद्र तरंगे, सिराज देशमुख, जि.प. सदस्य शाहीद पटेल, प्रमोद मरुरे, प.स.सदस्य किरण पाटील, अभिजित उसनाळे, बालाजी गोमसाळे, माधवराव पाटील, विठ्ठल पाटील, अजगर अन्सारी, महेश देशमुख, प्रशांत वांजरवाडे, राजप्पा वारद, तुषार सोमवंशी आदी उपस्थित होते.

---

## सर्वत्र गॅस सिलिंडर तुटवडा काळा बाजार, घरगुती गॅस व्यवसायीना सखोल चौकशी करून कारवाई करण्याची मागणी

दैनिक वादळ वार्ता
**दौंड । प्रतिनिधी**




न्यू महाराष्ट्र पँथर सेनेचे अध्यक्ष पँथर जयदीप माणिक बगाडे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांनसह तालुका पुरवठा अधिकारी मुकेशवार निमजे, दौंड तहसील कार्यालय दौंड यांना भेटून निवेदन दिले. अनेक ग्राहकांना गॅस एजन्सी कडून गॅस सिलिंडर उपलब्ध नाही किंवा पुरवठा कमी आहे आसे सांगून सिलिंडर देण्यात विलंब केला जात आहे.परंतु काही ग्राहकांनी प्रत्यक्ष एजन्सीवर जाऊन अतिरिक्त पैसे दिल्यास किंवा ओळखीच्या माध्यमांतून सिलिंडर लगेच उपलब्ध करून दिला जात असल्याच्या तक्रारी समोर येत आहे. यावरुन संबंधित गॅस एजन्सी कडून काळाबाजार होण्याची दाट शक्यता असल्याचे पँथर जयदीप बगाडे यांनी निवेदनात नमूद केले आहे.ऑनलाईन बुकिंग ठप्प झाली असून एजन्सीवर ग्राहकांनाच्या मोठ्या रांगा लागल्या आहेत. अनेक कायद्याचा अहवाला निवेदनात पँथर जयदीप बगाडे यांनी दिला आहे. पुणे जिल्ह्यातील सर्व गॅस एजन्सीची सखोल चौकशी ची मागणी करण्यात आली आहे. गॅस सिलिंडरचा कृत्रिम तुटवडा निर्माण केला जात आहे का याची चौकशी करून कारवाई ची मागणी केली आहे.ऑनलाईन बुकिंग प्रणाली तत्काळ सुरू करुन त्यालाच प्राधान्य देण्याची मागणी केली. काळा बाजार, साठे बाजी किंवा नियमभंग आढळल्यास संबंधित एजन्सीवर आवश्यक वस्तू अधिनियम व इतर लागू कायदया नुसार कठोर कारवाई ची मागणी पँथर जयदीप बगाडे यांनी केली तसेच हि मागणी करताना दौंड शहरात व तालुक्यात घरगुती गॅस सिलिंडरचा वापर हा हॉटेल व्यवसायीक मोठ्या प्रमाणात करत असून अश्या प्रकारा मुळे काही महिन्यांपूर्वी दौंड शहराजवळ जगदंबा हॉटेल मध्ये घरगुती गॅस सिलिंडरचा वापर करून त्यांच्या गंभीर स्फोट होऊन पाच ते सहा जन दगावले आहे. तरी दोषी गॅस एजन्सी वर कठोर कारवाई झाली नाही. व हॉटेल मालकावर देखील कारवाई झाली नाही. हया सर्व प्रकारची दखल घेऊन हॉटेल व गॅस एजन्सी अचानक धाड टाकणारे भरारी पथक नेमण्यात यावे व दोषींवर कठोर कारवाई करावी अशी मागणी न्यू महाराष्ट्र पँथर सेनेचे अध्यक्ष पँथर जयदीप बगाडे यांनी केली. दौंड पुरवठा अधिकारी मुकेशवार निमजे यांनी दोषींवर कारवाई केली जाईल.हॉटेल मालक व गॅस एजन्सी मालक यांना पत्र काढून समज दिली आहे. ग्राहकांनी सुद्धा विनाकारण गॅस एजन्सी समोर गर्दी करू नये. बुकिंग ऑनलाईन करून नंतरच गॅस घेण्यासाठी जावे दोषी कोणीही आढळल्यास गय केली जाणार नाही. त्यांच्या वर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.ग्राहकांना काही तक्रार असल्यास दौंड तहसील कार्यालय पुरवठा विभागात तक्रार दाखल करावी त्याची शहानिशा करून लगेच कारवाई करण्यात येईल असे पुरवठा अधिकारी मुकेशवार निमजे यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले. हया वेळी निवेदन देताना न्यू महाराष्ट्र पँथर सेनेचे अध्यक्ष पँथर जयदीप माणिक बगाडे, दौंड नगरपरिषदेचे माजी उपनगराध्यक्ष पांडूरंग गायकवाड, पत्रकार अतिष जगताप, विजय बगाडे, विनोद भालसेन तसेच इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# देगलूर येथे १५ मार्च रोजी बौध्द धम्म परिषदेचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**देगलूर । प्रतिनिधी**




देगलूर शहरात पहिली अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद दि.१५ मार्च २०२६ रविवार रोजी चिद्रावार जिनिंग मिल मैदान उदगीर रोड, देगलूर येथे पुज्य भदन्त धम्मसेवक महास्थवीर (मुळावा) यांच्या अध्यक्षतेखाली महाउपासक डॉ.एस.पी.गायकवाड यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आली. असून धम्म परिषदेचे उद्घाटन पुज्य भिख्खू करूणानंद महाथेरो (छ.संभाजीनगर) यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती धम्म परिषदेचे संयोजक धोंडीबा कांबळे मिस्त्री यांनी दिली आहे.

नांदेड जिल्ह्यातील तेलंगणा व कर्नाटक राज्य सिमेवरील देगलूर येथे विश्वाला शांतीचा संदेश देणारे महाकारूणीक तथागत गौतम बुद्धांनी दिलेल्या धम्माचा मार्ग समजून घेण्यासाठी अनेक अभ्यासू भिख्खू संघातील भंन्तेजीना निमंत्रित करण्यात आले आहे. त्यांच्या उपस्थितीत दि.१५ मार्च २०२६ रविवार रोजी पहिली एकदिवसीय अखिल भारतीय बौद्ध धम्म परिषद देगलूर येथे आयोजित करण्यात आली आहे. धम्म परिषद कार्यक्रम रूपरेषा नागार्जुन बुद्ध विहार सिध्दार्थनगर येथे त्रिरत्न वंदना व परित्राण पाठ पहाटे ५.३० ते ६.३० पर्यंत तर पंचशील धम्म ध्वजारोहण सकाळी ७.३० वाजता करण्यात येईल व समता सैनिक दलाच्या वतीने धम्मध्वजास मानवंदना देण्यात येणार आहे. तसेच नागार्जुन बुद्ध विहार येथून सकाळी ८.३० वाजता ३५० फूट धम्मध्वज रॅली भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्मारक मार्गे साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे स्मारक ते धम्म परिषदेचे ठिकाणी चिद्रावार मिल उदगीर रोड पोहचेल्यानंतर धम्म परिषद स्थळी धम्म ध्वजारोहण करण्यात येणार असून उपस्थित पुज्य भिख्खू संघास दुपारी ११ ते १२ वाजेपर्यंत भोजनदान दिले जाणार आहे.

धम्म परिषदेच्या अध्यक्षस्थानी पुज्य भदन्त धम्मसेवक महास्थवीर (मुळावा) अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश भिख्खू संघ, पुज्य भदन्त करूनानंद महाथेरो (महाकारूणीक बुध्दीस्ट मोनेस्ट्री, साजापूर संभाजीनगर औरंगाबाद), पुज्य भदन्त ग्यानरक्षित महाथेरो (अध्यक्ष, मैत्रेय चॅरिटेबल ट्रस्ट, संभाजीनगर औरंगाबाद), पुज्य भदन्त महाविरो थेरो(राष्ट्रीय उपाध्यक्ष भिख्खू संघ,लातूर), पुज्य भदन्त धम्मशिल थेरो बिड, या प्रमुख भिख्खू संघाची धम्मदेसना दुपारी १ ते रात्री १० वाजेपर्यंत होईल तर भंन्ते संघपाल थेरो नांदेड, भिक्खूणी चारुशीला नांदेड, भंन्ते रेवतबोधी जिंतूर, भंन्ते ज्ञानज्यती मानूर, भंन्ते बुध्दभुषण दाभड, भिख्खू पय्यवर्धन हिंगोली, भिख्खू पय्यारक्षित पुणे, भिख्खू संघरत्न परभणी यांच्यासह अनेक भिक्खूंची उपस्थिती लाभणार असल्याचे संयोजक धोंडीबा मिस्त्री कांबळे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे कळविले आहे. उपासक उपासिकांनी हजारोंच्या संख्येने धम्मपरिषदेस सहभागी व्हावेत व येताना शुभ्र वस्त्र परिधान करून यावे असे हि आवाहन करण्यात आले आहे.धम्म परिषदेचे संयोजक धोंडीबाजी कांबळे मिस्त्री, किशन वनंजे,संजय कांबळे, सतिश पांडवे, सुरज कांबळे, गजुभाऊ कांबळे, सचिनजी कांबळे,व्यंकट बोरगावकर,राहुल बेम्बरेकर, भीम भुताने, रामा माणिकमोते शीलाताई कच्छरे,शोभाताई कांबळे, नागरबाई कांबळे आदी धम्म परिषद यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

# केज नगरपंचायतीत घरकुल घोटाळा; बँक खाती गायब,जीएसटीचा भरणाच नाही,चौकशीत धक्कादायक गौडबंगा' समोर बँकेच्या भूमिकेवर ही प्रश्नचिन्ह

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतअंतर्गत प्रधानमंत्री नागरी घरकुल योजनेत झालेला कोट्यावधींचा घोटाळा आता एका नव्या वळणा वर येऊन ठेपला आहे. लाभार्थ्यांच्या हक्काचे पैसे ठेकेदार आणि कर्मचाऱ्यांच्या खिशात घालताना सर्व नियम पायदळी तुडवण्यात आलेच,पण आता चौकशी दरम्यान संबंधित बँक खातीच बंद असल्याचे समोरआल्याने खळबळ माजली आहे. विशेष म्हणजे,देयके जीएसटीसह उचलली असतानाही शासनाकडे जीएसटीचा एक रुपयाही भरला नसल्याचे उघड झाले असून,यात बँकेचा ही सहभाग असल्याचा ठपका ठेवण्यात आला आहे.

**काय आहे नेमकं प्रकरण?**

प्रधानमंत्री नागरी घरकुल योजनेतंर्गत ३७४ लाभार्थ्यांच्या घरांसाठी आलेला निधी नियमबाह्य पद्धतीने ठेकेदारांनावाटप करण्यात आला.या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांनी अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली आहे.मात्र,चौकशीत नगर पंचायतीकडून सहकार्य मिळण्याऐवजी अडथळेच अधिक येत आहेत.कामांच्या मंजुऱ्या,कार्यारंभ आदेश आणि मोजमाप पुस्तिका (MB) यांसारख्या महत्त्वाच्या संचिकाच नगरपंचायत कार्यालया तून गायब असल्याचे समोर आले आहे.

**बँकाही संशयाच्या फेऱ्यात**

नियमानुसार म्हाडाकडून आलेला ५ कोटी २४ लाखांचा निधी राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवणे बंधनकारक होते.मात्र, हा नियम धाब्यावर बसवून ही रक्कम महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या केज शाखेत ठेवण्यात आली.बंद खाती-३०ठेकेदारांना १५५ धनादेशांद्वारे ४ कोटी २४ लाख रुपये वाटण्यात आले.हे पैसे काढण्यासाठी ठेकेदारांनी ज्याबँकांमध्ये खाती उघडली होती,ती आता चौकशीच्या वेळी बंद असल्याचे आढळले आहे.

**बँकेची टाळाटाळ:**

चौकशी समितीने बँकांकडे माहिती मागितली असता,ती देण्यास टाळाटाळ केली जात आहे.यावरून बँकांचाही या घोटाळ्यात सक्रिय सहभाग असावा, असा संशय बळावला आहे.




**जीएसटीलाही मोठा चुना**

या घोटाळ्यातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे,ठेकेदारांनी देयके घेताना ती जीएसटीसह (With GST) उचलली आहेत.मात्र,या रकमेतील जीएसटीचा हिस्सा शासनाच्या तिजोरीत जमाच करण्यात आलेला नाही.हा थेट सरकारी महसुलावर टाकलेला दरोडा असल्याचे बोलले जात आहे.

**आमदार नमिता मुंदडां च्या लक्षवेधीला उत्तर**

या प्रकरणाचे पडसाद राज्य विधिमंडळातही उमटले.आमदार नमिता मुंदडा यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचने वर उत्तर देताना राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी या घोटाळ्यात बँकेचा सहभाग असल्याचे स्पष्टपणे नमूद केले आहे.त्यामुळे आता केवळ नगरपंचायत कर्मचारीच नव्हे,तर बँक अधिकारीही कारवाईच्या कचाट्यात येण्याची शक्यता आहे.

**नोटीस देऊनही ठेकेदार गप्प**

नगरपंचायतीने ६ मार्च रोजी संबंधित ठेकेदारांना ४८ तासांत खुलासे सादर करण्याचे आदेश दिले होते.मात्र,सहा दिवस उलटूनही बहुतांश ठेकेदारांनी उत्तर दिलेले नाही.यामुळे या प्रकरणा तील 'खाचखळगे' अधिकच गडद होत असून,दोषींवर कठोर फौजदारी कारवाई कधी होणार,याकडे केज वासीयांचे लक्ष लागले आहे.

# युसुफ वडगाव मंडळा तील मौजे सुकळी येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर टप्पा-१ संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसुफ वडगाव मंडळाचे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर टप्पा-१ कळंब - अंबाजोगाई रोड वरील सुकळी (गोटेगाव) येथील निसर्गराजा मंगल कार्यालय येथे दिनांक १४ मार्च २०२६ रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले.सदरील शिबीरास युसुफ वडगाव मंडळा तील नागरिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबीरास श्री.दीपक वजाळे उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई, श्री.अशोक भंडारे नायब तहसीलदार केज यांचे मार्गदर्शन लाभले. नागरिकांना एकाच दिवसात सेवा पुरविणे, हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.श्री.विकास हजारे मंडळ अधिकारी



युसुफवडगाव व युसुफ वडगाव मंडळातील सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले या विशेष शिबिरात शेकडो नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विविध दाखले व शासकीय सेवांचा लाभ घेतला.

# माजी सैनिक चंद्रकांत कसबे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व मान्यवरांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

माजी सैनिक तसेच एस बी आय बँक केज येथील माजी कर्मचारी चंद्रकांत ज्ञानोबा कसबे कोरेगाव यांचा वाढदिवस बीडरोड येथील पोलीस स्टेशन परिसरात सायंकाळी ७ वाजता उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.देशसेवा, शिस्तबद्ध जीवनशैली आणि समाजाप्रती असलेली आपुलकी यामुळे चंद्रकांत कसबे हे परिसरात प्रेरणादायी व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जातात. त्यांच्या कार्याचा गौरव करत



उपस्थित मान्यवरांनी त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा देत उत्तम आरोग्य,दीर्घायुष्य व यशस्वी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाला सामाजिक क्षेत्रातील मान्यवर,मित्र परिवार, पत्रकार बांधव व नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते बाबुराव गालफाडे,प्रा. रमेश पाटोळे,आसाराम बाबर,आझाद क्रांती सेनेचे तालुका प्रमुख शरद थोरात,डॉ. क्षीरसागर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून चंद्रकांत कसबे यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी उपस्थितांनी चंदू कसबे यांच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक करत पुढील काळातही ते समाजा साठी प्रेरणादायी कार्य करत राहावेत,अशी अपेक्षा व्यक्त केली. वाढदिवसाचा कार्यक्रम आनंददायी वातावरणात पार पडला.

# युसुफवडगाव केंद्रीय जि.परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसूफ वडगाव येथील केंद्रीय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपसरपंच महेश लामतुरे,गटशिक्षण अधिकारी सुनील केंद्रे, विस्तार अधिकारी संजय चौरे,केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे,शालेयव्यवस्थापन समिती अध्यक्ष ओंकार लामतुरे,उपाध्यक्षा चंद्रकांता निशिगंध,प्रमुख पाहुणे अरुण राऊत यांच्या सह शालेय व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते. उद्घाटनपर कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळेत पाल्य घालणाऱ्या पालकांना घरपट्टी व पाणीपट्टी कर माफ करण्यात येणार अशी ग्रामपंचायतच्या वतीने घोषणा करण्यात



आली. स्नेहसंमेलन कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी मराठी हिंदी विविध गीतांवर बहारदार नृत्य सादर करून प्रेक्षकांची मन जिंकली. महापुरुषांचा विचारांचा संदेश देणारी गाणी, महिलांचा सन्मान याबाबत प्रबोधनकरणारी गीत सादर करण्यात आले.मराठमोळ्या लावणीवर प्रेक्षकांनी ठेका धरला.कार्यक्रमास गावातील महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक बंधू भगिनींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे आभार मुख्याध्यापक शिवहार चोपणे यांनी व्यक्त केले.

# महामार्गावर मृत्यूचा थरार! गंगापूर पुलाजवळ ट्रेलरचा टायर फुटला; मोठा अनर्थ टळला!

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

धुळे-सुरत राष्ट्रीय महामार्गावर दिनांक १४ रोजी काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली. भरधाव वेगात असलेल्या एका महाकाय ट्रेलरचा टायर अचानक फुटल्याने तो थेट पुलाला जाऊन धडकला. सुदैवाने, चालकाने प्रसंगावधान राखल्याने आणि दैव बलवत्तर असल्याने मोठा भीषण अपघात टळला असून कोणतीही जीवितहानी झालेली नाही.मिळालेल्या माहितीनुसार, ट्रेलर क्रमांक ऋा ३९ ढइ ११९९ हा धुळ्याकडून सुरतच्या दिशेने निघाला होता. गंगापूर पुलाजवळ हा ट्रेलर आला असताना अचानक ट्रेलरचा मधला टायर फुटला आणि जोराचा आवाज झाला.टायर फुटताच चालकाचे वाहनावरील



नियंत्रण सुटले आणि ट्रेलर मोठ्या आवाजासह पुलाच्या बाजूला जाऊन धडकला.ज्या वेळी हा अपघात झाला, त्या वेळी सुदैवाने ट्रेलरच्या मागे किंवा बाजूला दुसरे कोणतेही वाहन नव्हते. जर एखादे वाहन जवळ असते, तर मोठा साखळी अपघात झाला असता. या अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

घटनेची माहिती मिळताच विसरवाडी परिसरातील स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. विस्कळीत झालेली वाहतूक पोलिसांनी तातडीने सुरळीत केली. सुदैवाने या अपघातात कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही, मात्र ट्रेलरचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

हायवेवर वाहन चालवताना टायरची स्थिती आणि वेग यावर नियंत्रण ठेवणे किती गरजेचे आहे, हेच या घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.

# नगरसेवक सदानंद भैय्या प्रधान यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी साजरा



दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव । प्रतिनिधी**

नगरसेवक सदानंद भैय्या प्रधान यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये शिक्षण, सेवा आणि समाजोपयोगी कार्याला प्राधान्य देण्यात आले.

या निमित्ताने जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील २९५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पेन्सिल आदी साहित्य देऊन शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले. तसेच सेवार्थ शिक्षण प्रसारक संस्थेच्या मुकबधीर निवासी शाळेत विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सोबतच सफाई कामगार महिलांना साड्या वाटप करण्यात आल्या याचबरोबर समाजहिताचा संदेश देत आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १७८ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. या रक्तदानातून अनेक गरजू रुग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे.सामाजिक बांधिलकी जपत वाढदिवस अशा उपक्रमांद्वारे साजरा करण्याची परंपरा कायम ठेवत नगरसेवक सदानंद भैय्या प्रधान यांच्या कार्याचे उपस्थितांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यकर्ते व नागरिकांनी सहकार्य केले.

# बोरद येथे प्रशासनाचा 'सुराज्य' संकल्प; महाराजस्व समाधान शिबिरातून ९३६ कुटुंबांच्या समस्या मार्गी

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्र शासनाच्या 'महसूल आपल्या दारी' या जनहिताच्या संकल्पनेला बळकटी देत, उपविभागीय अधिकारी कार्यालय तळोदा व तहसील कार्यालय तळोदा यांच्या संयुक्त विद्यमाने बोरद येथे आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर' अत्यंत उत्साही वातावरणात संपन्न झाले. या महत्त्वपूर्ण शिबिराचे उद्घाटन सहायक जिल्हाधिकारी शिवांश सिंग यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.



नागरिकांना महसुली कामांसाठी शासकीय कार्यालयांच्या वारंवार फेऱ्या माराव्या लागू नयेत, यासाठी या शिबिरात 'एक खिडकी सुविधा' केंद्र उभारण्यात आले होते. या सुविधेचा लाभ घेत परिसरातील नागरिकांनी आपल्या विविध समस्या आणि प्रलंबित प्रकरणे मांडली. प्रशासनाने अत्यंत तत्परतेने कार्यवाही करत तब्बल ९३६ लाभार्थ्यांना विविध दाखले आणि प्रमाणपत्रे जागेवरच प्रदान केली. यामध्ये प्रामुख्याने उत्पन्न, जात, अधिवास, राष्ट्रीयत्व प्रमाणपत्रे, तसेच डिजिटल अद्ययावत ७/१२ व ८-अ उतारे यांचा समावेश होता.

या शिबिराचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे महसूल प्रशासनाने घेतलेले धाडसी निर्णय. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) २०२५ आणि १० फेब्रुवारी २०२६ च्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करत, अनेक शेतकऱ्यांच्या वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये रूपांतरित करण्यात आल्या. या निर्णयामुळे शेतकऱ्यांच्या जमिनींच्या मालकी हक्काचा वर्षानुवर्षांचा प्रश्न कायमस्वरूपी सुटला असून, प्रलंबित फेरफार प्रकरणे निकाली काढल्यामुळे गाव दप्तर अद्ययावत झाले आहे.

केवळ महसूल विभागच नव्हे, तर आरोग्य, कृषी, महिला व बालविकास आणि बँकिंग अशा विविध विभागांनी एकाच छताखाली आपले स्टॉल उभारून नागरिकांना शासकीय योजनांची सविस्तर माहिती दिली. विशेषतः सिकलसेल रुग्ण, विधवा महिला, अपंग आणि गरजू नागरिकांना विविध सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला. तसेच, शासन निर्णयानुसार एस आय आर मोहिमेअंतर्गत मतदार नोंदणी, नाव दुरुस्ती आणि स्थलांतराचे अर्ज स्वीकारून त्यावर तातडीने कार्यवाही करण्यात आली.

या यशस्वी शिबिरासाठी तहसीलदार दिपक धिवरे, नायब तहसीलदार विजय ससे,निशा नाईक,उप अधीक्षक भूमी अभिलेख अनिल चांगूने, दुय्यम निबंधक अशोक सोनकांबळे यांच्यासह महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी, लोकनियुक्त सरपंच अनिता भिलाव उपसरपंच संतोष ढोडरे ,ग्रामविकास अधिकारी विजय पाटील, मंडल अधिकारी मिथुन राठोड, ग्राम महसूल अधिकारी प्रदीप वसावे आणि बोरद गावातील लोकप्रतिनिधी यांनी मोलाची भूमिका बजावली.प्रशासनाच्या या उपक्रमामुळे बोरद परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, स्थानिक प्रशासनाच्या या 'सुराज्य' संकल्पनेचे सर्वत्र कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077